गुरुवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०२२

अधिसूचना

क्रमांक : १७/२०२२ दि. १०/०२/२०२२

विषय :- कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०२१

सर्व सामान्यांच्या माहिती करीता कळविण्यात येते की, विनियम क्र. २४/२००२ नुसार माजी आमदार स्व. द.ना. उपाख्य बबनराव मेटकर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून सुरू करण्यात आलेल्या **कै.नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०२१** साठी **श्री. अरूण वामनराव शेवाने, मु.पो. कापुसतळणी, ता.अंजनगांव, जि.अमरावती** यांची पुरस्कार निवड समितीने एकमताने निवड केली आहे.

संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीनुसार कार्य करणारे समाजसेवक **श्री. अरूण वामनराव शेवाने, मु.पो. कापुसतळणी, ता.अंजनगांव, जि.अमरावती** यांनी अनेक समाजोपयोगी कार्य केले असून त्यासाठी आपले स्वतःचे संपूर्ण जीवन समर्पित केले आहे. त्यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा **'कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०२१'** घोषित करण्यात आला आहे.

स्वा/-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****